ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.V/Nov 2011pp.1-4

Research Paper

# महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हयातील आदिवासी समाजातील सामाजिक परिवर्तन

डॉ.डी.जी. म्हशाखेत्री
प्राचार्य तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय़ गडचिरोली
जिल्हा गडचिरोली ह्यम.रा.ह

*प्रस्तावना*

महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हा प्रामुख्याने आदिवासी बहुल व मागासलेला जिल्हा अशी ओळख आहे. महाराष्ट्रातील अतीमागास ह्यप्रमितिविए टरबिएह आदिवासी जमातीपैकी 'माडीया गोंड' ही जमात गडचिरोली जिल्हयात बहुसंख्येने आहे. भारत सरकारच्या **2001** च्या जनगननेनुसार गडचिरोली जिल्हयातील एकूण लोकसंख्येपैकी आदिवासींची लोकसंख्या **38.30** टक्के एवढी आहे. गडचिरोली जिल्हा नैसर्गिक वनसंपत्तीने नटलेला असून जिल्हयाच्या एकूण क्षेत्रफळापैकी **79** टक्के जंगल आहे. मात्र हा जिल्हा उदयोगविरहीत आहे. जिल्हयातील 'माडीया गोंड' आदिवासी जमात जंगलव्याप्त परीसरात वास्तव्य करते.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ आदिवासींची होणारी पिळवणूक थांबवून त्यांचा सामाजिक व आर्थिक विकास होण्यासाठी विविध योजना राबविते. आदिवासी विकास महामंडळाच्या विविध योजना घेतलेल्या लाभार्थ्यांचा अध्ययन करीत असतांना आदिवासींच्या सामाजिक परिवर्तनाविषयी तथ्ये प्राप्त झाली त्यातून संशोधनातील फलींतांच्या माध्यमाने गडचिरोली जिल्हयातील आदिवासी समाजातील सामाजिक परिवर्तने स्पष्ट होण्यास मदत होईल.

## सामाजिक परिवर्तन (Social change) -

परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. आणि तो समाजाचाही नियम आहे. कोणतीही बाब स्थिर नसते त्यामध्ये बदल होत असते. पतिवर्तनाच्या संकल्पनेचे अध्ययन अनेक समाजशास्त्रज्ञांनी केले. सुरूवातीला समाजशास्त्रज्ञांनी उत्क्रांती प्रगती व सामाजिक परिवर्तन यात कोणताही फरक केला नव्हता. या तिन्ही संकल्पनांचा अर्थ एकच किंवा सारखाच घेण्यात येत होता. **1922** मध्ये ऑगबर्न या शास्त्रज्ञाने सर्वप्रथम वरील संकल्पनेतील भेद स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर अनेक अभ्यासकांनी याचा आधार घेऊन अध्ययन केले सामाजिक परिवर्तनाची संकल्पना स्पष्ट केली.

'परिवर्तन' म्हणजे बदल होय. या पृथ्वीवरील कोणताही मानवी समाज असा नाही की त्यामध्ये बदल झालेला आढळून येत नाही. म्हणजेच समाज कोणताही असो जसे आदिवासी समाज असो किंवा आधुनिक प्रगत समाज असो त्यांच्यात परिवर्तनाची प्रक्रिया सतत सुरू असते. "सामाजिक परिवर्तनाची दिशा ही बयाच वेंलि अत्यंत मंद व अव्यक्त घटकांद्वारे नियंत्रित होते हे अव्यक्त घटक प्रत्येक परिस्थितीच्या गरजेतून किंवा निकडीतून वर येतात की जे कर्त्याच्या माध्यमातून वा आकांक्षातून पुढे येतात." समाजाच्या दृष्टीने परिवर्तनाचा अर्थ म्हणजे सामाजिक संरचनेत होणारे परिवर्तन म्हणजेच सामाजिक परिवर्तन होय यावर अनेक समाजशास्त्रज्ञांचे एकमत आहे. या सामाजिक संरचनेच्या परिवर्तनात अनेक घटक जबाबदार असतात. त्यात "भौगोलिक घटक आर्थिक घटक राकाजेय घटक लोकसंख्यात्मक घटक सांस्कृतिक घटक वांशिक घटक शैक्षणिक घटक इत्यादी." सामाजिक पतिवर्तन होत असतांना अनेक घटकांचा प्रभाव कारणीभूत ठरतो. या संकल्पनेचे अनेक शास्त्रज्ञांनी अध्ययन केलेले आहे त्यात हॅरी जॉन्सन किंग्जले डेव्हीस मॅक आयव्हर व पेज डी.बी. कुप्पुस्वामी डॉ.जी.आर. मदन टॉलकॉट पारसन्स विल्बर्ट मुर इत्यादिचे विचार व अध्ययन महत्वाचे आहेत.

सामाजिक परिवर्तनाची संकल्पना अधिक स्पष्ट करण्यासाठी शास्त्रज्ञांनी सांगितलेल्या व्याख्यांचा परामर्श घेणे आवश्यक आहे.

सामाजिक परिवर्तनाच्या व्याख्या

किंग्जले डेव्हीसच्या मते, "By Social change is meant only such alterations occur in social organization, that is structure and functions of society." म्हणजेच सामाजिक परिवर्तन हे सामाजिक संघटनेत याचा अर्थ समाजातील संरचना आणि कार्य यात झालेले बदल होत.

विल्बर्ट मूर यांच्या मते 'सामाजिक परिवर्तन हा कोणत्याही अपवादाविना एक अनिवार्य नियम आहे. याचा अर्थ असा नाही की सामाजिक परिवर्तनात सामाजिक संरचनेचे कोणत्यातरी अंगात निश्चित परिवर्तन होते आणि सामाजिक पुनर्निर्माणाच्या बदल होत असलेल्या अंगात परिवर्तनाची गती सर्वात अधिक असते.'

डॉ. रविंद्र नाथ मुकर्जी म्हणतात 'सामाजिक परिवर्तन म्हणजे ज्यामध्ये मानविय सामाजिक अर्न्तक्रिया व अर्न्तसंबंध संगठित नियंत्रित व स्थिर राहतात.'

सामाजिक परिवर्तनावर विवेचन करतांना मॅक ऑयव्हर व पेज म्हणतात की 'एक समाजशास्त्रज्ञ म्हणून आपण असा आग्रह धरला पाहिजे की सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संबंधात होणारे बदल होत.'

आपल्या ह्या विवेचनावर भाष्य करतांना मॅक ऑयव्हर व पेज म्हणतात की समाजाचा अभ्यास हा संस्कृती आणि सुधारणा यांच्यापेक्षा वेगळा आहे. ज्या समाजव्यवस्थेत त्या जन्माला येतात त्या समाजव्यवस्थेच्या साध्य संबंधातील बदलत्या घटकात एक प्रकारचे संतुलन प्रस्थापित करतात.

वरील शास्त्रज्ञांच्या व्याख्या व विवेचनावरून "कोणत्याही सामाजिक संरचनेचे भूमिका समुह उपसमुह प्रमाणके व मूल्ये हे चार प्रमुख घटक आहेत. या घटकांतील परिवर्तनाचा प्रभाव समाज संरचनेवर पडतो व सामाजिक परिवर्तन घडून येते. म्हणजेच समाजातील संरचनात्म बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय हे स्पष्ट होते."

सामाजिक परिवर्तन याचा अर्थ केवळ किंवा हास असा एकांगी अर्थ अभिप्रेत उर्ध्वगामी किंवा अधोगामी देखील असू शकते. त्यासोबतच समाजातील लोकांच्या दृष्टीकोणानुसारही त्याचा अर्थ अभिप्रेत होऊशकतो.

सामाजिक परिवर्तनाची प्रकिया काही समाजात तिव्र असते तर काही समाजात मंद असते. साधा रणता ज्या समाजात गतिशिलतेचे प्रमाण अधिक असते तेथे परिवर्तनाचा वेग जास्त असतो तर याच्या उलट ज्या समाजात गतिशिलता कमी असते त्या समाजात परिवर्तन हे मंद असते.

समाजव्यवस्थेत सुनियोजित किंवा सामाजिक नियोजनाद्वारे परिवर्तने घडत असतात. आदिवासी समाजामध्येही अनेक प्रकारचे बदल निरंतरपणे घडत आहेत. यातूनच आदिवासी समाज नवीन रूप धारण करीत आहे. 'आंतरक्रियेत बध्द असणाया व्यक्ती परस्परांना प्रभावित करणार व थोडा का

होईना परस्परामध्ये बदल घडवून आणणारच. कोणत्याही समाजव्यवस्थेत ह्यआदिवासी समाजव्यवस्थेत सुध्दाह्न अशा प्रकारची परिवर्तने अखंडपणे घडत असतात.'

काळाच्या ओघात भारतीय आदिम समाजामध्ये सुध्दा परिवर्तन घडून येत आहेत. जुन्या परंपरागत संस्था नष्ट झाल्या जामिनदारी राजेशाही व्यवस्था संपुष्टार आली जुनी मुल्ये बदलली जुन्या जीवनपध्दतीत बदल झाला व त्याऐवजी नवी संस्था नवीन मूल्ये आधुनिक जीवनपध्दती अस्तित्वात आली. सामाजिक बदलाची स्थित्यंतराची गती वाढली. परिवर्तनाची ही प्रकिया गडचिरोली जिल्हयातील मागास आदिवासी समाजात सुध्दा दिसून येते. प्राचिन भारतीय ग्रामीण चित्र पूर्णतः बदललेले दिसून येते.

आदिम जमातीतील सामाजिक परिवर्तन (Social Transformation in Tribal community)

ब्रिटिशांच्या काळात आदिवासी जमातींचा प्रगत समाजाशी अनेक करणामुळे संपर्क वाढला. स्वातंक्योत्तर काळात आदिवासींना विकासाच्या राष्ट्रीय प्रवाहात सामवून घेण्याचे प्रयत्न सुरू झाले. राज्यघटनेतील तरतुदीनुसार अनेक सोयी सवलती प्रदान करून आदिवासींचा उत्थान विकास करण्याचा आजतागायत सुरू आहे. याचा परिणाम त्यांच्यात बयाचशा प्रमाणात परिवर्तन झालेले दिसून येतात. आदिवासी समाजाची सामाजिक परिवर्तनाची प्रकिया आधुनिक सभ्य समाजाच्या संरचनेशी साम्य ठेवून आहे. ज्या वैशिष्टयांकरिता आदिवासी जमातींची विशेष ओळख होती ती वैशिष्टये काळाच्या ओघात नष्ट झालेत व होत आहेत. आदिवासी समाजात सुध्दा निरंतर परिवर्तनाची प्रकिया सुरू आहे यासंदर्भात "समाजशोधन" या नियतकालीकेत म्हटले आहे की "Tribes and other Backword classes, the implementation of land reforms. the democratic system of government based on universal franchise and other developments have brought about radical changes." लोकशाही व्यवस्थेतील विकासात्मक शासकीय धोरणांमुळे आदिवासी व मागासवर्गामध्ये आमुलाग्र बदल होत आहे याच दृष्टिकोनातून आदिम जमातीमधील सामाजिक परिवर्तने खालीलप्रमाणे आहेत.

## 1. कुटुंब संस्थेतील परिवर्तन

मुद्राप्रधान अर्थव्यवस्था शिक्षणाचा प्रसार स्थानपरिवर्तन तसेच प्रगत समाजाच्या संपर्काने आदिवासी समाजातील कुटुंबसंस्थेत बदल होत आहेत. त्यांच्यातील संयुक्त कुटुंब पध्दती हळूहळूका होईना विभक्त कुटुंब पध्दतीमध्ये परिवर्तीत होत आहे. अर्थार्जन करण्यासाठी आदिवासी समुदायातील लोक शहराकडे किंवा औद्योगिक क्षेत्राकडे येऊन वास्तव्य करीत आहेत. शासनाच्या अनेक कायद्यामुळे व कायद्याच्या जाणीवेमुळे त्यांच्यात कौटुंबिक बदल होऊन केंद्र कुटुंबाची संख्या वाढत आहे. कुटुंब हितापेक्षा स्वहिताला प्राधान्य दिल्या जात आहे. इतरांच्या संपर्काने आदिवासी व्यक्ती आत्मकेंद्री बनत आहे. त्यांच्यातील वाढत असलेले शिक्षणाचे प्रमाण व शिक्षणासाठी बाहेरगावी वास्तव्यास येणारी त्यांची नवीन पिढी यांच्यात वेगाने कौटुंबिक बदल होऊन स्वतःच्या हक्काविषयी सुजाण झाली आहे.

## 2. विवाहसंस्थेतील परिवर्तन

आदिवासींमध्ये बाह्य संपर्कामुळे विवाह संस्थेत सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही स्वरूपाचे बदल घडून येत आहेत. आदिवासी समाजात असलेली 'वधूमूल्याची' प्रथा कालबाह्य होत आहे त्याऐवजी 'हुंडापध्दती' ह्यवरमूल्यह्न काही प्रमाणात सुरू झालेली आहे. कायद्यामुळे अपहरण विवाह पलायन विवाह यावर निबंध असल्याने त्याचे प्रमाण कमी झाले आहे. बालविवाह युवक युवतींच्या इच्छेचा मान माता पित्याचे कमी महत्व अशा प्रथा हिंदुविवाह पध्दतीमुळे निर्माण झाल्याचे दिसून येते. आदिवासी समाजातील सरळ साधी घटस्फोटाची पध्दती होती त्यात कायद्याच्या जाणिवेमुळे शिक्षित समाज न्यायालयाचे द्वार ठोठावू लागला. प्रगत समाजाच्या संपर्काने विवाह मुहूर्त विवाह विधी या बाबींचा शिरकाव त्यांच्या समाजात झाला. याबाबत "समाज शोधन" या नियतकालीकेत असे म्हटले आहे की 'Primitive organization and culture began to change as a result of introduction of Sanskritic elements from outside.' आदिवासींच्या प्राथमिक संस्था आणि संस्कृती यात बाहेरील सांस्कृतिक घटकांमुळे परिवर्तन होत आहे. एकंदरीत विवाहसंस्थेतील परिवर्तनामुळे त्याचे कौटुंबिक जीवन अधिक अस्थिर बनलेले आहे.

## 3. सांस्कृतिक परिवर्तन

आदिम समाज आर्थिक परिस्थितीने दारिद्री किंवा कमजोर असला ततरी त्यांच्यात प्रगत व सुसंस्कृत संस्कृती होती. या संस्कृतिच्या बळावरच आज 'मागास' ठरलेला आदिवासी काळाच्या ओघात अनेक उलथापालथ झाली असली तरी आदिवासी मात्र एकसंघ व निश्चल असा उभा आहे. वास्तविक खरी माणूसकीची शिकवण देणारी संस्कृती आदिम समाजातच आढळते. परिवर्तनाच्या प्रकियेत आदिम संस्कृतिचे सांस्कृतिक केंद्र 'गोंटूल' किंवा 'युवागृह' हास पावत आहेत. नाहीच्या बरोबरीत आहेत. या युवागृहाचे पतन हा आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनातील अत्यंत महत्वाचे परिवर्तन आहे. बाहय संस्कृतीच्या प्रभावाने त्यांचे पारंरिक लोकगीत लोकनष्य वादन कला यांच्या मुळ स्वरूपात परिवर्तन होऊन नष्ट होत आहेत. आधुनिक सिनेमासंगीत सिनेमा दूरदर्शनवरील विविध कार्यक्रम यातून त्यांचे मनोरंजन होत आहे. 'रिमिक्स' संस्कृतीने त्यांच्यातही शिरकाव केलेला दिसून येतो. संस्कृतीच्या बाबतीत त्यांची अवस्था 'इकडे आड तिकडे विहीर' अशी झालेली आहे. एकतर सभ्य समाजाची संस्कृती ते पूर्णपणे स्विकारू शकले नाही दुसरीकडे स्वतःची मुल संस्कृती सोडवत नाही अशी द्वीधा अवस्थेतून आदिवासी मार्गक्रमण करीत आहे. आदिवासींचा पारंपारिक सांस्कृतिक ठेवा नष्ट होत आहे. याबाबतीत जे.एस.माथुर म्हणतात " the reibal culture undergoes a rapid change." आदिम समाजात सांस्कृतिक परिवर्तन तिव्र गतीने आदिम समाजात होत आहेत ही वास्तविकता आहे.

## 4. धार्मिक परिवर्तन

भारतात व्यापारी उद्देश्याने आलेल्या ब्रिटीशांनी आदिवासी भागात खिश्चन धर्मप्रसारकांनी शिक्षण आरोग्य आर्थिक मदत अशा अनेक माध्यमातून धर्मप्रसाराचे काम केले. सेवा हे महत्वाचे धोरण ठेवून खिश्चन मिशर्नयांनी अनेक राज्यातील आदिवासींचे धर्मांतर घडवून आणले. आदिवासी त्यांच्या चर्चमध्ये जाऊन प्रार्थना करू लागले. खिश्चन धर्माचा प्रसार थांबविण्यासाठी हिंदू धर्म प्रसारकांनी सुध्दा हिंदू धर्माचा प्रचार केला. हिंदू धर्मातील अनेक तथा विधी देव देवता यांची पुजा आदिवासीत रूढ झाल्या. इतर धर्मियांच्या जवळीकतेने आदिवासींच्या जीवनातील अविभाज्य अंग म्हणजे धर्म व जादूचा प्रभाव कमी होऊ लागला. धर्म व जादूमुळे जीवनातील अडचणी दूर करणे अनेक समस्यांवरील उपाय अशी आदिवासींची प्रगाढ श्रध्दा कमी झाली. वैद्यकीय सेवांच्या प्रचार व प्रसारामुळे आदिवासी डॉक्टरकडे दवाखाण्यात येऊन उपचार घेऊ लागला आहे. त्याचसोबत त्यांच्या समाजातील समाजाचे एकता स्थैर्य एकरूपता टिकविण्यास धर्म व जादूची महत्वाची भूमिका होती. म्हणजेच धर्म व जादूमुळे आदिवासी समाजाचे जीवन नियंत्रित केल्या जात होते. परिवर्तनाच्या प्रकियेत याबाबत आदिवासींच्या मनातील श्रध्दा कमी झाली. 'जे पुढारलेले आदिवासी आहेत ते लग्न मरण वगैरे प्रसंगी हिंदू धर्मियांप्रमाणे वागू लागले आहेत. लग्न म्हणजे नाच हया कल्पनेसही फाटा मिळाला आहे. मरणोत्तर पिंड देण्याची प्रथा त्यांच्यात सुरू झाली आहे. पण हिंदू धर्मातील अनेक चालीरीती त्यांनी स्विकारलेल्या असला तरी ते पुरे हिंदू बनलेले नाहीत.' वैज्ञानिकता वाढली नविन शिकलेल्या आदिवासी तरूणांच्या पिढीचे जीवनपध्दतीत आमुलाग्र परिवर्तन झाले आहे.

## 5. शैक्षणिक परिवर्तन

आरक्षण व घटनात्मक तरतुदीमुळे आदिवासींच्या शैक्षणिक व उत्थानासाठी शासनाचे अविरत प्रयत्न सुरू आहेत. 'कोणत्याही मागासलेल्या समाजाचा विकास व्हावयाचा असेल विशाल बहुश्रुत समाजात तो सहज एकरूप एकात्म व्हायचा असेल तर प्रथम त्या समाजात शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे.'

शिक्षणाचे साधन मानवी जीवनाचा 'टर्निंग पॉईट' आहे हे सत्य आहे .

यानुसारच आज आदिम समाजात शिक्षणाच्या प्रचाराचा काम जोमाने सुरू असून त्यांच्यातील साक्षरतेचे प्रमाण निश्चतच वाढत आहे . 'आदिवासीची अनेक मुले शाळेत जाऊ लागली आहेत . नीटनेटकी कपडे करू लागली आहेत . नाच गाण्याइतकीच शिकण्यातही रस घेऊलागली आहेत .' सोयी ं सवलतींच्या लाभ घेऊन बरेच आदिवासी जमातीं मधील बुध्दीमान् होतकरू मुले उच्चपदस्थ कार्यरत आहेत . आज गडचिरोली सारख्या आदिवासी मागास जिल्हयात प्राध्यापक् डॉक्टर् शिक्षक् अधिकारी या पदांवर बरीच मंडळी कार्यरत आहे . याचा परिणाम म्हणजे आदिवासी जमातीत एक प्रकारे स्तरीकरण निर्माण झालेले आहे . नवीन पिढीतील शिक्षणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे . 'बैगा आदिवासी औद्योगिकीकरण् आधुनिकीकरण व शासकीय प्रयत्नामुळे सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतून जात आहेत . त्याच्यातील राहणीमान् खान ं पान व्यवस्था तसेच सामाजिक ं आर्थिक संस्था व शिक्षण् स्वास्थ यांना वेगळी दिशा मिळाली आहे .' भामरागड् एटापल्ली या दुर्गम भागातील बरीच मुले उच्च शिक्षणासाठी नागपूर शहरात वास्तव्याला आहेत . सुशिक्षित आदिवासी वेगवेगळया सामाजिक व आर्थिक संघटनेते वेगवेगळी पदे भुषवित आहे . शैक्षणिक परिवर्तनाचे वारे आदिवासीत वाढू लागले आहेत . त्यांचे राहणीमान पुर्णतः बदललेले आहे हे दुर्लक्षित करून चालणार नाही .

6 . आर्थिक परिवर्तन

आदिम समाजात आर्थिक सुधारणा होण्यासाठी शासनाने अनेक विभागाद्धारे 'आर्थिक सुधार कार्यक्रम' राबवून अनेक योजना सुरू केल्या आहेत . 'वर्तमान काळात गोंडाचे जीवनात बदल होत आहे . हा बदल ग्रामीण व शहरी संपर्कात असलेल्या गोंडामध्ये जास्त आहे . स्थानांतरीत शेरीच्या ऐवजी सखोल लागवडीची पध्दती सुधारित बी ं बियाण्यांचा वापर् शालेय शिक्षण व्यवस्था प्राथमिक आरोग्य केंद्र दळणवळणाची साधने इत्यादींचा बराच सकारात्मक प्रभाव या जमातीवर दिसत आहे .' स्थानांतरीत शेती करणारा आदिवासी स्थिर शेती करण्यास शिकला . शेती करण्यात दिवसेंदिवस सुधारणा होत आहेत . भामरागड् एटापल्ली भागातील बरेच शेतकरी मिरची भाजीपाला सारखे उत्पादन घेत आहेत . केवळ उदरनिर्वाहापुरते उत्पादन न करता विक्री करण्याकरीता उत्पादन करण्यास सुरूवात झाली आहे . शेती सोबत कुक्कुटपालन् दुग्धव्यवसाय् बकरीपालन् वराहपालन अशी पुरक धंदे आदिवासी करू लागले आहेत . अनेक प्रकारच्या मोफत प्रशिक्षणाचा फायदा आदिवासी अर्थार्जनासाठी करीत आहेत . जंगलातील गौणवनोउपज पूर्वी स्वतःसाठीच वापरात परंतु शासनाने खरेदी करण्यात सुरूवात केली तेव्हापासून त्यांच्या जीवनात आर्थिक मदत होण्यास सुरूवात झाली . प्रगत समाजाच्या संपर्काने व आधुनिक अर्थव्यवस्थेमुळे आदिवासीत आत्मनिर्भरता निर्माण होत ाहे . 'आधुनिक समाजाच्या संपर्काने आदिम समाज बदलत आहे . त्यांच्या अर्थ व्यवस्थेतही बदल होत आहे हा बदल अपरिहार्य आहे .'

नवीन पिढीतील सुशिक्षित आदिवासी तरूण ं तरूणी शहरात 'कॉम्प्युटर इंस्टिटयूट ं मध्ये काम करणे कंत्राटदाराकडे काम करून स्वतः कंत्राट घेणे अशा अनेक माध्यमातून त्यांच्या आर्थिक जीवनात नवीन परिवर्तने पाहावयास मिळतात .

## 7. राजकीय परिवर्तन

आधुनिक लोकशाही शासन व्यवस्थेतील पंचायत राज व्यवस्था प्रत्येक गावात् खेडयापडयात अस्तित्वात आली आहे . आदिवासी समाजात उदयास आलेले नेतृत्व् आरक्षित मतदार संघातून निवडून आलेले त्यांचे प्रतिनिधी मंत्री यांच्यामुळे राजकीय पक्ष निवडणूका मतदान याविषयी आदिवासींना जाणीव झाली . लोकशाहीची प्रक्रिया त्यांच्यापर्यंत पोहचली त्यामुळे त्यांच्या समाजात असलेले परंपरागत प्रथेचे महत्व कमी झाले . त्यांच्यात अजूनही 'जातपंचायती' कार्यरत आहेत् मात्र लोकशाही व्यवस्थेत जातपंचायतीचे महत्व किंवा प्रभाव कमी झालेले आहे . आदिवासीतील नवीन पिढी आदिवासी विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून राजकीय व सामाजिक कार्ये करतांना दिसतात . राजकीय परिवर्तन आदिवासीमध्ये होत आहेत व झाले आहेत .

8 . कुल् गोत्र पध्दतीतील परिवर्तन

कुल किंवा गोत्र हे आदिवासी समजातील सामाजिक नियंत्रणाचे महत्वाचे साधन होते . सध्या त्यात परिवर्तन झाल्याचे दिसून येते . अनेक कारणांनी आदिवासी स्वतःचे मुळ गाव सोडून इतरत्र राहण्यास सुरूवात केली आहे त्यामुळे कुलासंबंधीचे निर्बंध शिथील झालेले आहेत . गोत्राचा संबंध फक्त विवाह जुळविण्यापर्यंतच मर्यादित राहिला आहे . आज संचार साधने दळणवळणाच्या सोयीत झालेली वाढ स्थान परिवर्तन अशा अनेक कारणांनी नातेदारी व्यवस्था वाढीस लागली आहे . पूर्वीचे कुलव्यवस्थेचे सिमीत स्वरूप संपुष्टात येऊन त्यात व्यापकता निर्माण झाली आहे .

या प्रकारे आदिवासींच्या जीवनातील नविन पतिवर्तनाने त्यांच्यातील समस्येत नवीन समस्यांनी घर केले आहे . आधुनिक परिवर्तनाने त्यांना जीवनविषयक समस्या सुटण्याऐवजी समस्यांत अधिक भर पडलेली आहे .

संदर्भ ग्रंथ सूची


1 . प्रा . कुलकर्णी पी . के . - 'प्रगत समाजशास्त्रीय सिध्दांत', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर 1997 पृ . क . 376

2 . डॉ . तोष्णीवाल एस . आर - 'उच्चतर समाजशास्त्रीय सिध्दांत', पिंपळापुरे ॲड . कं . पब्लीशर्स, नागपूर - 2001, पृ क . 211

3 . Kingsley Devis - स्त्रोत-डॉ . तोलीवाल एस . आर . – 'उच्च समाजशास्त्राीय सिध्दांत', पिंपळापूरे ॲन्ड . कं . पब्लीशर्स, नागपूर 2001, पृ . क . 213

4 . W.E. Moore - 'Social Change' - Prentice Hall of India, New Delhi - 1965 - p - 2

5 . डॉ . मुकर्जी रविंद्रनाथ - 'समकालीन उच्चतर समाजशास्त्रीय सिध्दांत', विवेक प्रकाशन, दिल्ली - 2004, पृ . क . 243

6 . मॅकआयव्हर व पेज - स्त्रोत . प्रा . कुलकर्णी पी . के . - 'प्रगत समाजशास्त्रीय सिध्दांत', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर - 1997, पृ . क . 335

7 . डॉ . भांडारकर पु . ल . - समाजशास्त्रीय सिध्दांत', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती प्रा . वैद्य नी . स . मंडळ, नागपूर 1986, पृ . क . 326

8 . Journal - 'SAMAJA SHODHANA' - Manglore Sociological As sociation - Vol - 2 - 1993, P.16

9 . Ibid - P - 14

10 . Dr.Vidyarthi L.P - 'Applied Anthropology in India' - Kitab Mahal, Allahabad 1968,P-146

11 . डॉ . गारे गोविंद - 'महाराष्ट्रातील आदिवासी संस्कष्ती, समस्या व विकास', आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे - 1988, पृ . क . 212 . डॉ . गारे गोविंद 'आदिवासींचे शिक्षण', साकेत प्रकाशन, औरंगाबाद - 1997, पृ . क . 191

12 . डॉ . गारे गोविंद - 'महाराष्ट्रातील आदिवासी संस्कष्ती, समस्या व विकास', आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे - 1988 पृ . क . 78

13 . 'XX All India - Manglore Sociology Association, Manglore - 1993 -P- Sociological Conference 61

14 . डॉ . खडसे भा . कि - 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र' , हिमालया पब्लिशींग हाऊस, मुंबई - 2006, पृ . क . 180

15 . प्रा . नाडगोंडे गुरूनाथ द - 'भारतीय आदिवासी', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे - 2003, पृ . क . 274 .